1 कॉपी

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** नवी मुंबई **P.S.(ठाणे):** कोपरखैरणे
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0452 **Year (वर्ष):** 2023
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/12/2023 16:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** सोमवार **Date From (दिनांक पासून):** 26/06/2023
**Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/06/2023
**Time From (वेळेपासून):** 20:17 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 21:23 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 21/12/2023 **Time (वेळ):** 15:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 048
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/12/2023 16:33 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** से नं 02 A, ,कोपरखैरणे रजिस्टर ऑफिस, ,नवी मुंबई

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** सागर लक्ष्मण• दातखिळे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1996

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सेनं 1, रूम नं 755, ,एसएस 2, कोपरखैरणे , ,कोपरखैरणे,नवी मुंबई, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सेनं 1, रूम नं 755, ,एसएस 2, कोपरखैरणे , ,कोपरखैरणे,नवी मुंबई, महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8850111150

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. रामजी महाद्या हाडळ | | | 1. उमा पॅराडाईज , रुम नं 608, ,बी 01, सहावा मजला,, टिटवाळा पुर्व, जि ठाणे ,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई
दिनांकः- 21/12/2023

मी सागर लक्ष्मण दातखिळे वय 27 वर्ष, धंदा व्यवसाय, रा. से.नं. 1, रूम नं. 755, एसएस 2, कोपरखैरणे, नवी मुंबई असा असुन, समक्ष अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात हजर राहून फिर्याद लिहून देतो की, (मो.नं. 8850111150)

मी वरील ठिकाणी माझे वडिल श्री. लक्ष्मण दातखिळे, आई सौ. कमल दातखिळे व बहिण सौ. सुमिता पवार असे राहतो. माझा 'होम केअर प्रोडक्ट' चा व्यवसाय असुन तो 'एस. के. श्री. कमल' यानावाने रजिस्टर आहे. सदरचे राहते घरे हे दुमजली असून पहील्या व दुस-या मजल्यावरील रूममध्ये आम्ही कुटुंबासह राहत आहोत. तसेच तळमजळयावरील आमचे मालकीचा असलेला गाळा आम्ही सन 2012 पासुन वेगवेगळे भाडेकरू यांना भाडेतत्वार देत आहोत. सध्या सदरचा गाळा आम्ही सौ. सुजाता पंकज ठाकूर यांना तीन वर्षाच्या मुदतीवर भाडेतत्वावर दिलेला असुन त्याबाबत भाडेकरारनामा केलेला आहे.

मी करीत असलेल्या 'होम केअर प्रोडक्ट' या व्यवासायासाठी घेतलेला परवाना माझ्या वरील राहत्या पत्यावर रजिस्टर आहे. सदर व्यवसायासाठी मला पैशाची आवष्यकता असल्याने त्याकरीता राहते घरावर तारणकर्ज मिळण्याकरीता मी गणेश पतपेढी, कोपरखैरणे, येथे गेलो असता, त्यांना आमच्या गाळयामधील सध्याचे भाडेकरु सौ. सुजाता पंकज ठाकुर व माझी आई सौ. कमला दातखीले यांच्यासोबत तीन वर्षाकरीता केलेल्या भाडेकराराचे कागदपत्र दाखविले. सदरचे कागदपत्रांची गणेश पतपेढी यांच्याकडुन ऑनलाईन पाहणी केली असता, त्यांना सदरचा गाळा आम्ही दिनांक 01/08/2012 ते दिनांक 31/07/2015 या तीन वर्षाच्या कालावधीसाठी जीसीएस गारमेन्टस तर्फे भागीदार श्री. आसिफ उमर पीटी यांना भाडेतत्वार दिल्याबाबतचा करारनामा दि. 06/08/2012 रोजी दुय्यम निबंधक कार्यालय, कोपरखैरणे या कार्यालयामध्ये रजिस्टर केल्याचे दिसुन आले. त्यामुळे त्यांनी माझेकडे सदर रजिस्टर भाडेकरारनाम्याची प्रत मागितली. त्याप्रमाणे मी घरी येवून सदर रजिस्टर भाडेकरारनाम्याची प्रत शोधली असता ती मला मिळुन आली नाही.

मी गणेश पतपेढी यांच्याकडुन घेत असलेल्या तारण कर्जासाठी मला दिनांक 01/08/2012 ते दिनांक 31/07/2015 या तीन वर्षाच्या कालावधीसाठी जीसीएस गारमेन्टस तर्फे भागीदार श्री. आसिफ उमर पीटी यांच्यासोबत झालेल्या करारनाम्याची प्रतची आवश्वाकता असल्याने त्यानुसार मी दिनांक 03/05/2023 रोजी कोपरखैरणे, रजिस्टर ऑफीस येथे गेलो असता सदर ठिकाणी असणारे षिपाई श्री. रामजी हाडळ यांनी मला त्यांच्या कार्यालयातील फॉर्म दिला व सदरचा फॉर्म भरून मी त्यांच्याकडे परत दिल्यानंतर त्यांनी मला रू. 80/- चे चलन दिले. त्याचवेळी श्री. रामजी हाडळ यांनी मला 'सदर दस्तऐवजाची साक्षाकिंत प्रत तात्काळ पाहिजे असल्यास रू. 3,000/- दयावे लागतील' असे सांगितले. परंतू 'मी त्यांना आता माइयाकडे पैसे नाहीत' असे सांगीतल्यावर षिपाई श्री. रामजी हाडळ यांनी मला 'पैसे घेवून आल्यावर तुम्हाला दस्तऐवजाची साक्षाकिंत प्रत देतो' असे सांगितले. परंतु त्याचदरम्यान माझे मुळगावी माझे नातेवाईक मयत झाल्याने मी त्याच दिवशी मुळगावी निघून गेलो व काही दिवस तिकडेच थांबलो.

मी गावावरुन परत आल्यनंतर दिनांक 26/06/2023 रोजी कोपरखैरणे रजिस्टर ऑफीस मधील शिपाई श्री. रामजी हाडळ यांचा मोबाईल फोन नंबर 9867466681 वर फोन करून 'माझे गाळयाचे दस्तऐवज तयार आहे का ?' असे विचारले असता त्यांनी मला 'खात्री करून तुम्हाला सांगतो' असे सांगितले. त्यानंतर शिपाई श्री. रामजी हाडळ यांनी माझ्या मोबाईलवर फोन करून 'दस्तऐवज तयार असे बोलुन सांगीतले प्रमाणे पैसे घेवून ये व दस्तऐवज घेवून जा' असे सांगितले. कोपरखैरणे, रजिस्टर ऑफीस मधिल शिपाई श्री. रामजी हाडळ हे माइयाकडून रू. 3,000/- घेतल्याषिवाय माझा वरील दस्तऐवज देणार नाही यांची मला खात्री होती. कायदेषीर फि च्या रक्कमे

व्यतिरीक्त मागणी करण्यात आलेली रक्कम रू.3,000/- ही लाच असुन ती देण्याची माझी आजिबात ईच्छा नसल्याने माझेकडे लाचेची मागणी करीत असलेले कोपरखैरणे, रजिस्टर ऑफीस मधिल शिपाई श्री. रामजी हाडळ यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी याबाबत मी दिनांक 26/06/2023 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई येथे करीता पोनि. विद्युलता चव्हाण, अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई यांचेसमक्ष तक्रार दिली.
मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने लाचेची सत्यता पडताळणी करणे करीता पोनि. विद्युलता चव्हाण, अँन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई यांनी त्यांचे कार्यवाही प्रमाणे प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल, जि. रायगड येथुन दोन शासकीय पंच साक्षीदार यांची मागणी केल्याप्रमाणे सदर कार्यालयातील पंच साक्षीदार 1) श्री. शरद शंकर शिंदे, वय 40 वर्ष, कनिष्ठश् लिपिक, 2) श्री. मोहन रामभाऊ काटोळे, वय 55 वर्ष, कनिष्ठ लिपिक, हे अँन्टी करप्शन ब्युरो नवी मुंबई कार्यालयात हजर झाले. त्यावेळी पोनि. विद्युलता चव्हाण, यांनी सदर पंचाना माझी ओळख करून देवून त्यांची ओळख मला करून दिली.
मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशगांने दिनांक 26/06/2023 रोजी लाचेच्या सत्यता पडताळणीकरीता मला डिजीटंल व्हाँईस रेकाँर्डरसह पंच क्रं. 1 श्री. षिंदे यांचेसह दुय्यम निबंधक कार्यालय, कोपरखैरणे येथील माझेकडे लाचेची मागणी करणारे शिपाई श्री. रामजी हाडळ यांची भेट घेण्यासाठी पाठविले. त्याप्रमाणे मी कोपरखैरणे, रजिस्टर ऑफीस येथे कार्यालयीन शिपाई श्री. रामजी हाडळ यांची भेट घेतली. त्यावेळी त्यानी माझेकडे शासकीय फि व्यतीरिक्त मागणी केलेल्या रू. 3,000/- लाचेच्या रक्कमेच्या अनुशंगाने चर्चा केली. त्यावेळी कार्यालयीन शिपाई श्री. रामजी हाडळ हे माझेकडे मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या अनुशगाने स्पष्टपणे सांगत नसल्याने त्यावेळी मी त्यांना मागणी केलेली लाचेच्या रक्कममेमधून काहीतरी कमी करण्यास सांगीतले असता त्यावेळी षिपाई श्री. हाडळ यांनी मला ''जाऊन ये ना'' असे सांगितले. त्यावर मी त्यांना ''किती मला सांगा तर काही'' असे बोललो त्यावेळी शिपाई श्री. हाडळ यांनी ''ये घेऊन तुला काय दयायचेत ते..... दे ना तू कायपण'' असे बोलले असता मी ''नक्की नाराज नाय होणार ना ?'' असे बोललो. त्यानंतर शिपाई श्री. हाडळ हे ''नाय नाराज नाय होणार'' असे सांगितले. त्यानंतर मी ''आलो एक पंधरा वीस मिनीटात तुम्हाला मी फोन करतो '' असे बोलुन तेथुन निघुन आलो. सदरचे संभाशण डिजीटल व्हाँईस रेकाँर्डर मधिल मेमरी कार्डवर ध्वनिमुद्रित करण्यात आलेले आहे.
सदर संभाशणावरून षिपाई श्री. हाडळ यांनी माझ्याकडे गाळयाच्या रजिस्टर दस्तऐवजाची सांक्षाकिंत प्रत देण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्याचे दिसून आले. परंतु लाचेची रक्कमेची नेमकी किती मागणी करीत आहेत हे स्पश्ट न झाल्याने षिपाई श्री. हाडळ यांना पुन्हा भेटून ते माझयाकडून नेमकी किती लाचेची रक्कम मागत आहेत ? या अनुशंगाने पुन्हा पडताळणी करण्याचा पोनि. विद्युलता चव्हाण यांनी निर्णय घेतला.
त्यानंतर पुन्हा लाचेच्या तक्रारीची पडताळणी दरम्यान डिजीटल व्हाईस रेकाँर्डरसह मी व पंच क्रं. 1 श्री. शिंदे असे षिपाई श्री. रामजी हाडळ यांची कोपरखैरणे, रजिस्टर ऑफीस येथे जावून पुन्हा भेट घेतली. त्यावेळी मी शिपाई श्री. हाडळ यांना गाळयाच्या रजिस्टर दस्तऐवजाची सांक्षाकिंत प्रत देण्यासाठी विनंती करून '' जेव्हा डाँक्युमेंन्ट दिले तेव्हा तीन हजाराची झालेली वार्ता होती मी काय म्हणतो थोड फार कमी करा अस माझ म्हणण आहे बाकी काय नाय '' असे सांगितले. त्यावेळी शिपाई श्री. हाडळ यांनी '' तुला काय दयायचे खुशीने'' असे म्हणून शिपाई श्री. हाडळ यांनी माझ्या गाळयाच्या दस्तऐवजाची साक्षांकिंत प्रती दिल्या. त्यानंतर मी '' खुशीने म्हणजे एक आकडा सांगा ना किती ते '' असे विचारले असता, शिपाई श्री. हाडळ यांनी '' नाय नाय '' असे म्हणाले. त्यानंतर मी '' मी काय म्हणतो तुम्ही मला एक आकडा सांगा .. मी तो घेवून येतो तुम्ही मला सांगितल पण नाय '' असे सांगितले. त्यावेळी शिपाई श्री. हाडळ यांनी '' नाय नाय'' असे म्हणून रक्कमेचा निश्चित आकडा न सांगता '' देवून टाक तुला काय दयायचे आहे ते'' असे बोलले त्यावर, षिपाई श्री. हाडळ यांनी '' तु कधी आता देणार आहे आता देणार आहे की नंतर '' असे विचारले. त्यावर मी '' तीन होत नाही मला '' असे बोललो व '' किती किती देवू तुम्हाला तुम्ही सांगा'' असे विचारले असता शिपाई श्री. हाडळ यांनी '' आकडा कुठे सांगु तुला '' असे सांगितले. त्यावेळी मी '' सांगा ना मी घेवून आलो थोडेफार पैसे तुम्ही म्हणशाल तेवढेच दिले का तुम्ही सांगा त्या हिशोबाने सकाळी शंभर टक्के घेवून येतो बीना फोन करता वाटल तर '' असे बोलले त्यावेळी षिपाई श्री. हाडळ यांनी '' नाय नाय अमाऊन्ट नाही तुला काय खुषीने दयायचे दे तुझया खुषीने काय दयायचे दे '' असे सांगुन ते कार्यालयातून बाहेर येवून रिक्षात बसून निघुन गेले. त्यानंतर आम्ही पुन्हा पायी चालत पडताळणी पथकाजवळ आलो. त्यानंतर लोकसेवक श्री.हाडळ यांचा मला लाचेच्या रक्कमेसंबधानी फोन आल्यास पुढील लाचेची सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले होते. परंतु लोकसेवक श्री.हाडळ यांनी लाचेच्या रक्कमेसंबधाने मला संपर्क केलेला नाही.
माझेकडे लाचेची मागणी करणारे दुय्यम निबंधक कार्यालयातील कार्यालयीन शिपाई श्री. हाडळ यांची मी लाचेच्या सत्यता पडताळणी दरम्यान पंच साक्षीदार यांचेसमवेत दिनांक 26/06/2023 रोजी भेट घेतली असता त्यांनी ''ये घेऊन तुला काय दयायचेत ते...दे ना तू कायपण'' असे मला बोलले त्यांनी नेमकी किती लाचेची रक्कम मागीतली हे

स्पश्ट न झाल्याने त्याचदिवशी मी पुन्हा पंचसाक्षीदार यांचे समक्ष लोकसेवक श्री.हाडळ यांची भेट घेतली असता त्यावेळी त्यांनी मला दस्ताऐवजाची सत्यप्रत दिली त्यावेळी त्यानी मला लाचेची मागणी करून 'तुला खुशीने काय दयायचे ते दे' असे बोलले त्यावेळी त्यांनी नेमकी रक्कम सांगितली नाही व रिक्षातुन निघुन गेले. त्यानंतर लोकसेवक श्री.हाडळ यांनी लाचेच्या रक्कमेसंबधाने मला संपर्क केलेला नाही. त्यामुळे लोकसेवक श्री. हाडळ हे मला लाचेच्या रक्कमे संबधाने संपर्क करतील किंवा माझ्याकडून लाचेची रक्कमेचा स्विकार करतील याची मला शाश्वती वाटत नसल्याने कार्यालयीन शिपाई श्री. हाडळ यांनी मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या अनुशंगाने त्यांच्यावर योग्य ती कायदेषिर कारवाई होणेकरीता मी श्रीमती. विद्युलता चव्हाण, पोलीस निरीक्षक, ऐसीबी, नवी मुंबई यांचेसमक्ष दिनांक 30/06/2023 रोजी जबाब दिलेला आहे.

आज दिनांक 21/12/2023 रोजी मला ऐसीबी नवी मुंबई कार्यालयात हजर राहण्याबाबत दिलेल्या सुचनेप्रमाणे मी ऐसीबी, नवी मुंबई कार्यालयात हजर राहीलो. त्यावेळी मला श्रीमती. विद्युलता चव्हाण, पोलीस निरीक्षक, यांची ऐसीबी, नवी मुंबई येथून बदली झाली असून त्यांचा पद्भार पोलीस निरीक्षक श्रीमती. अरुंधती येळवे यांनी स्विकारला असल्याचे समजले. त्याचवेळी मला मी दिनांक 26/06/2023 रोजी दुय्यम निबंधक कार्यालयातील कार्यालयीन शिपाई श्री. रामजी हाडळ यांच्याविरुध्द दिलेल्या लाचेच्या तक्रारीच्या अनुशंगाने मा. पोलीस अधीक्षक, ऐसीबी, ठाणे कार्यालयाकडून लोकसेवक श्री. रामजी हाडळ, शिपाई, दुय्यम निबंधक कार्यालय ठाणे क्र. 8, कोपरखैरणे, नवी मुंबई यांच्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 (संशेधन 2018) चे कलम 7 प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची परवानगी प्राप्त झाली असल्याचे पोनि. अरुंधती येळवे यांच्याकडुन समजले आहे.

तरी दिनांक 26/06/2023 रोजी मी दिलेल्या लाचेच्या तक्रारीमध्ये आमच्या राहते घरातील तळमजल्यावरील दुकानगाळा आम्ही दिनांक 01/08/2012 ते दिनांक 31/07/2015 या तीन वर्शाच्या कालावधीसाठी जीसीएस गारमेन्टस तर्फे भागीदार श्री. आसिफ उमर पीटी यांना भाडेतत्वावर दिल्याबाबत दुय्यम निबंधक कार्यालय, कोपरखैरणे येथे झालेल्या रजिस्टर भाडेकरारनाम्याच्या दस्तऐवजाची सांक्षाकिंत प्रत देण्याकरीता दुय्यम निबंधक कार्यालय, कोपरखैरणे येथील कार्यालयीन शिपाई श्री. रामजी हाडळ यांनी माझेकडे शासकीय फी व्यतिरीक्त रू. 3,000/- लाचेच्या  लाचेच्या रक्कमेची मागणी करून त्यांना लोकसेवक या नात्याने मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग केल्याने त्यांच्या विरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे. माझा वरील फिर्यादी जबाब माझे समक्ष संगणकावर टंकलिखीत केलेला असून तो मला वाचून समजावून सांगितला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष                    हे लिहून दिले सही
दिनांक 21/12/2023

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Sarika Shivaji More
**Rank** (पद): SI (Sub-Inspector)    **No.**(क्र.): 151010004025M
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): AJAY HANUMANTRA(

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PBMH73679

पोलीस ... अमलदार
कोपर... ...लीस ठाणे
... मुंबई